N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S. (पोलीस ठाणे):** वाशिम **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0600 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/07/2025 22:05 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** बुधवार **Date from (दिनांक पासून):** 09/07/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 09/07/2025

**Time Period (कालावधी):** प्रहर ६ **Time From (वेळेपासून):** 15:55 तास **Time To (वेळेपर्यंत):** 16:08 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 09/07/2025 **Time (वेळ):** 21:46 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 028 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 09/07/2025 21:46 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. (a) **Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** उत्तर, 01 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मुख्य एम एस इ बी कार्यालय,वाशिम-444505

(c) **In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):** (महाराष्ट्र)

6.

Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): श्री. गणेश धोंडु इंगळे

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1994

(d) Nationality (राष्‍ट्रीयत्‍व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | टो पोस्ट कोकलगाव ता जि वाशिम, वाशिम, वाशिम, वाशिम, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | टो पोस्ट कोकलगाव ता जि वाशिम, वाशिम, वाशिम, वाशिम, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-8698604351

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिलीप पंढरी नंदापुरे | | | 1. Town/Village (शहर / गाव): वाळकी ता जि वाशिम,Tehsil (तहसील): वाशिम,Police Station (पोलीस ठाणे): वाशिम,District (जिल्हा): वाशिम,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/रु लाच रक्कम | 500.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 500.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दिनांक:-09/07/2025 नाव:- श्री. गणेश धोंडु इंगळे ,वय 31 वर्ष, व्यवसाय - शेती रा.मु.टो पोस्ट कोकलगाव ता. जि. वाशिम, मो. नं. 8698604351.

मी समक्ष येऊन तक्रार देत आहे की, मी वरील ठिकाणी राहत असुन वडिलोपार्जीत शेती करतो. माझ्या वडीलांच्या नावावर अडीच एकर शेतजमिन ही ग्राम टो येथे आहे. त्या शेती मध्ये बोअरवेल आहे. बोअरवेल पासुन अंदाजे चारशे फुटवर लाईनचा खंबा आहे. सदरचे बोअरवेलवर मी

माझे वडीलांचे नावे मागेल त्याला सौर कृशी पंप योजणे अंतर्गत दि.3/3/2025 रोजी ऑनलाईन अर्ज केला होता व मी त्याच दिवशी सौरपंपा करीता 11,486 रुपये लाभार्थी हिस्सा ऑनलाईन भरला होता. त्यानंतर मला दि.24/06/2025 रोजी माझे मोबाईलवर मॅसेज मिळाला की, मागेल त्याला सौर कृषी पंप योजणे अंतर्गत संयुक्त सर्वेक्षण करण्याची तारीख दि.26/06/2025 रोजी नियोजीत केली आहे. महावितरण प्रतिनिधी व पुरवठादार प्रतिनिधी यांचेसोबत नियोजित दिवशी संयुक्त सर्वेक्षण पूर्ण करण्यास उपस्थित रहावे.दि.26/06/2025 माझे शेतामध्ये महावितरणचे प्रतिनीधी म्हणुन कंत्राटी लाईनमन नंदापुरे साहेब व पुरवठादार प्रतिनिधी आले होते. सर्वेक्षण करत असतांना कंत्राटी लाईनमन नंदापुरे साहेब यांनी मला तुझे काम करून दिले. त्यांच्या मोबाईलवरील माझे सौरपंपाचे कृषी सर्वेक्षण पुर्ण झाले बाबतचा मॅसेज त्यांनी मला दाखविला. सदर कामाचा मोबदला म्हणुन 1000/- रुपये मागीतले होते. त्यावेळेस माझे कडे सध्या पैसे नाहीत मी तुम्हाला नंतर देतो. असे मी सांगितले होते परंतू सदर शासकीय योजना असल्याने कोणतेही पैसे लागत नसल्याने नंदापूरे साहेब लाच मागत असल्याचे माझे लक्षात आले. परंतू मला लाच दयायची ईच्छा नसल्याने मी लाईनमन नंदापूरे साहेब यांचेवर लाच कारवाई करण्याचे ठरविले .दि.8/7/2025रोजी मी कंत्राटी लाईनमन नंदापूरे यांचेवर लाच कारवाई करणेबाबत तक्रार करण्याकरीता लाचलूचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय वाशिम येथे येवून हजर असलेल्या पोनि ए.एम.गायकवाड मॅडम यांना भेटून माझी संपूर्ण तक्रार त्यांना तोंडी सांगितली. माझी तक्रार समजून घेवून पो नि गायकवाड मॅडम यांनी तात्काळ जिल्हा परिषद कार्यालय वाशिम येथून 2 शासकीय पंच उपलब्ध करून घेतले. पो नि गायकवाड यांनी मला पंचासमक्ष माझी तक्रार कथन करण्यास सांगितले वरून मला कंत्राटी लाईनमन नंदापूरे साहेब हे आमचे शेतातील सौरपंपाचे कृषि सर्वेक्षण करण्याचे मोबदल्यात 1000/रू ची मागणी करत आहेत असे मी तोंडी सांगितले . त्यानंतर माझी तक्रार मी माझे अक्षरात लिहून दिली ती खालीलप्रमाणे:- मी समक्ष येऊन तक्रार देत आहे की, मी वरील ठिकाणी राहत असुन माझा व्यवसाय शेती आहे. माझ्या वडीलांच्या नावावर अडीच एकर जमिन ही ग्राम टो येथे आहे. त्या शेती मध्ये बोअरवेल आहे.बोअरवेल पासुन अंदाजे चारशे फुटवर लाईनचा खंबा आहे. सदरचे बोअरवेलवर मी माझे वडीलांचे नावे मागेल त्याला सौर कृशी पंप योजणे अंतर्गत दि.3/3/2025 रोजी ऑनलाईन अर्ज केला होता. व मी त्याच दिवशी सौरपंपा करीता 11,486 रुपये लाभार्थी हिस्सा ऑनलाईन भरला होता. त्यानंतर मला दि.24/06/2025 रोजी माझे मोबाईलवर मॅसेज मिळाला की मागेल त्याला सौर कृशी पंप योजणे अंतर्गत संयुक्त सर्वेक्षण करण्याची तारीख दि.26/06/2025 रोजी नियोजीत केली आहे. महावितरण प्रतिनिधी व पुरवठादार प्रतिनिधी यांचेसोबत नियोजित दिवशी संयुक्त सर्वेक्षण पूर्ण करण्यास उपस्थित रहावे. दि.26/06/2025 माझे शेतामध्ये महावितरणचे प्रतिनीधी म्हणुन कंत्राटी लाईनमन नंदापुरे साहेब व पुरवठादार प्रतिनिधी आले होते. सर्वेक्षण करत असतांना कंत्राटी लाईनमन नंदापुरे साहेब यांनी मला तुझे काम करुन दिले. त्यांच्या मोबाईल वरील माझे सौरपंपाचे कृषी सर्वेक्षण पुर्ण झाले बाबतचा मॅसेज त्यांनी मला दाखविला. सदर कामाचा मोबदला म्हणुन 1000/- रुपये मागीतले होते. त्यावेळेस मी त्यांना सांगीतले होते की माझे कडे सध्या पैसे नाहीत मी तुम्हाला नंतर देतो. त्यांनतर कंत्राटी लाईनमन नंदापुरे यांचा मला दि.01/07/2025 रोजी तसेच आज दि.08/07/2025 रोजी माझे मोबाईलवर फोन आला व पैशासंबधी मागणी केली. मला त्यांना पैसे देण्याची इच्छा नाही.माझा त्यांच्याशी कोणताही आर्थीक व्यवहार नाही. कंत्राटी लाईनमन नंदापुरे



4/7

साहेब, महावितरण वाशिम यांनी मला माझ्या वडीलांच्या नावावर मागेल त्याला सौर कृषी पंप योजणे अंतर्गत सौरपंपाचे कृषी सर्वेक्षण पुर्ण केल्याचा मोबदला म्हणुन 1000/- रुपये लाचेची मागणी केली आहे. कारवाई होणेस विनंती आहे.सदरचे तक्रारी सोबत माझ्या वडीलांच्या नावावर मागेल त्याला सौर कृषी पंप योजणे अंतर्गत सौरपंपाचे मागणी करीता केलेला ऑनलाईन अर्जाची व लाभार्थी हिस्सा ऑनलाईन भरल्या बाबतची पावतीची झेराक्स प्रत देत आहे. मी दिलेल्या लेखी तक्रारीवर मी सही केली. तसेच मी दिलेली लेखी तक्रार वाचुन दोन्ही पंच व समक्ष म्हणुन पो.नि.अल्का गायकवाड लाप्रवि वाशिम यांनी सहया केल्या.माझे तक्रारीची शहानिशा करणेकरीता पडताळणी कारवाई करण्याचे ठरले.वरून पो.नि.गायकवाड यांनी मला कंत्राटी लाईनमॅन नंदापुरे यांची कोठे? व कधी भेट होईल? असे विचारले असता कंत्राटी लाईनमॅन नंदापुरे यांनी मला भेटण्यासाठी बालु चौक, शमशेर अल्ली यांचे दुकानाजवळ वाशिम येथे बोलावले असल्याचे सांगितले.वरून पडताळणी मध्ये काय प्रक्रीया केली जाते याबाबत मला तसेच दोन्ही पंच यांना माहिती दिली. त्यानंतर मला व्हाईस रेकॉर्डर लावून पंच क्र.01 सह कंत्राटी लाईनमन यांनी बोलाविलेल्या ठिकाणी बालु चौक, शमशेर अल्ली यांचे दुकानाजवळ माझे मोटार सायकलवर पाठविण्यात आले. बालू चौक येथे पोहोचल्यावर कंत्राटी लाईनमॅन नंदापुरे यांचा फोन माझे मोबाईल वर आला त्यांनी मला सांगितले की, समोरच्या चहाच्या हॉटेलवर या वरुन मी, पंच क्र.01 असे मागे पुढे चहाचे हॉटेल कडे चालत गेलो असता कंत्राटी लाईनमॅन नंदापुरे हे हॉटेलमध्ये हजर होते. मी कंत्राटी लाईनमॅन नंदापुरे साहेब यांना म्हटले की," ते त्या दिवशी तुमचा फोन आला की नाही त्या दिवशी इकड गेलतो मराठवाडयात ... हो ते तारीख होती हिंगोलीत तेच्या मुळ अन आज पेपर आला...तुमची अनं माही भेटच नाही व्हा लागली..त्यावर कंत्राटी लाईनमॅन नंदापुरे साहेब यांनी मला म्हटले की, "दोन तिन दिवस झाले तुम्हाले कॉल करायलो" त्यानंतर मी कंत्राटी लाईनमॅन नंदापुरे साहेब यांना म्हटले की," बर ठिक हाये मी काय म्हणतो ते आपल सोलरच गेले का समोर" त्यावर गै.अ. नंदापुरे यांनी मला म्हणाले की,"हो त्यावर मी गै.अ.नंदापुरे यांना म्हणाले की, "अस का त मंग आपल पुढच्या स्टेपल गेल का" त्यावर मला गै.अ. नंदापुरे म्हणाले की, "झालत मंग कंपनी थ्रु फोन येईल कधी काय ते तुमच तुम्हाले वाशिम हुन घ्या लागल बाकी काम झाले ते" त्यावर मी गै.अ. नंदापुरे यांना म्हणालो की, "किती दयायचे' त्यावर मला गै.अ. नंदापुरे म्हणाले की, "सातशे रुपये ऐरी काय जास्त नाही सांगत मी" त्यावर मी गै.अ. नंदापुरे यांना म्हणालो की, "सातशे ले होतात साहेब" त्यावर मला गै.अ. नंदापुरे म्हणाले की, "लय नाही खोट नाही सांगत तुमच्या गावातनी पंधाराशे रुपये घेतो." त्यावर मी गै.अ. नंदापुरे यांना म्हणालो की, "पाचशे घ्या" असे म्हटले असता त्यावर मला गै.अ. नंदापुरे म्हणाले की, "सातशे रुपयात तुमंचा फायदाही ....क्लियर बोला काय हाये ते" त्यावर मी गै.अ. नंदापुरे यांना म्हणालो की, "सातशे ले होलात साहेब" त्यावर मला गै.अ. नंदापुरे म्हणाले की, "सातशे दया" त्यावर मी गै.अ. नंदापुरे यांना म्हणालो की, "पाचशे देतो" त्यावर मला गै.अ. नंदापुरे म्हणाले की, "सकाळी पहा तुमच्या गावालाच येत आहे". त्यावर मी गै.अ.नंदापुरे यांना म्हणालो की, "मी वाशिम ला सोयाबिन विकायला येत आहे". त्यावर मला गै.अ.नंदापुरे म्हणाले की, "मी चार वाजेपर्यंत वाशिम ला येतो... उदया दुपारी भेटा" असे म्हणुन निघून गेले.मी व पंच क्र.01 असे लाप्रवि कार्यालया वाशिम येथे परत आलो. व्हाईस रेकॉर्डर वरिल संभाशण ऐकले असता कंत्राटी लाईनमन नंदापुरे साहेब यांनी माझे वडीलांच्या नावावर मागेल त्याला सौर कृषी पंप योजणे

अंतर्गत सौरपंपाचे कृषीसर्वेक्षण पुर्ण केल्याचा मोबदला म्हणुन माझेकडे 700/- रु लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 500/-रु दि.09.07.2025 रोजी पैसे स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले. कंत्राटी लाईनमन नंदापूरे यांचेवर दि.9/07/2025 रोजी सापळा कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. तसेच 09/07/2025 रोजी लाप्रवि कार्यालय वाशिम येथे येतांना लाच रक्कम देण्याकरीता मी 500/रू सोबत आणणेबाबत सुचना दिल्या.काल दि.8/7/2025 रोजी ठरल्याप्रमाणे मी आज दि.09/07/2025 रोजी दुपारी 14/00 वा सुमारास सापळा कारवाई करिता लाप्रवि कार्यालय वाशिम येथे हजर आलो असता पंच देखील हजर होते. पो.नि.अल्का गायकवाड यांनी आम्हास सापळा कारवाई दरम्यान गोपनियतेच्या सुचना दिल्या तसेच कंत्राटी लाईनमॅन नंदापुरे यांना 500/- रुपये लाच रक्कम हजर करणेबाबत बोलल्या असता मी 100/-रूपये दराच्या 5 नोटा, असे एकुण 500/-रूपये पंचासमक्ष हजर केले. सापळा कारवाई सुरु करणे अगोदर मी कंत्राटी लाईनमॅन नंदापुरे यांना त्यांचे फोनवर फोन करुन कुठे भेटायला येवू ? अशी विचारणा केली असता कंत्राटी लाईनमॅन नंदापुरे यांनी मुख्य एम.एस.इ.बी कार्यालय वाशिम येथे भेटी करीता बोलाविल्याने सापळा कारवाई ही मुख्य एम.एस.इ.बी कार्यालय वाशिम येथे करण्याचे ठरले. मला व पंच क्र.01,पंच क्र.02 यांना सापळापूर्व व यशस्वी सापळा पंचनाम्यामधील सुचनांची परत उजळणी करुन देवुन तसेच लाच रक्कम स्विकारताच मी माझे गळयातील शैला काढून घडी करून खांदयावर टाकावा असा ईशारा करावा तसेच संपूर्ण सापळा पथक एम ए सी बी कार्यालयात आमचे आजूबाजूला च असणार अशा महत्वपूर्ण सुचना देवुन माझे शर्टाचे आतील बनियानला व्हाईस रेकॉर्डर लावुन देवुन पंच क्र.01 सह कंत्राटी लाईनमॅन नंदापुरे यांना त्यांचे मागणी केल्याप्रमाणे लाच रक्कम देणे कामी रवाना केले. मी मुख्य एम.एस.इ.बी कार्यालय वाशिम येथे पोहचलो असता त्याठिकाणी माझे अगोदार सापळा कारवाईचे पथक सापळा लावुन दबा धरुन बसल्याचे मला दिसले मी पंच क्र.01 यांना कार्यालयाचे बाहेर गाडीवरुन उतरुन देवुन मुख्य एम.एस.इ.बी कार्यालय वाशिम च्या इमारतीमध्ये गेलो असता तेथे कॅशीयर रुम जवळ मला कंत्राटी लाईनमॅन नंदापुरे हे भेटले त्यांना "मी रामराम केल्यावर त्यांनी मला चला म्हटले व कार्यालयाचे बाहेर आले मी सुध्दा त्यांचे मागोमाग कार्यालयाचे बाहेर आलो कार्यालयाचे बाहेर कंत्राटी लाईनमॅन नंदापुरे यांना मी पैसे आणले साहेब असे म्हटल्यावर त्यांनी मला दे असे म्हटल्याने मी सापळा अधिकारी यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे माझे पॅन्टच्या खिशातील लाच रक्कम काढुन कंत्राटी लाईनमॅन नंदापुरे यांना दिली नंदापूरे यांनी 500/रू लाच रक्कम घेवुन मोजली व त्यांचे डाव्याहातात धरुन ठेवली . मी ठरल्याप्रमाणे माझे गळयातील शैला गळयातुन काढुन खांदयावर टाकुन लाच रक्कम स्विकारलेबाबत पूर्व नियोजीत इशारा केला त्यावरून तात्काळ सापळा पथक आमचे जवळ आले व कंत्राटी लाईनमॅन नंदापुरे यांना 500/रू लाच रक्कमेसह ताब्यात घेवुन त्यांच्या कडुन लाच रक्कम हस्तगत केली व नंदापूरे यांना पुढिल कारवाई करीता लाप्रवि कार्यालय वाशिम येथे आणण्यात आले. दिलीप पंढरी नंदापुरे, वय-34 वर्षे, व्यवसाय-कंत्राटी कामगार बाहयवर्ग लाईनमन/तंत्रज्ञ, ग्रामीण पश्चिम, उपविभाग वाशिम, एम.एस.इ.बी.कार्यालय वाशिम, रा.वाळकी ता.जि.वाशिम यांनी माझे वडीलांच्या नावावर मागेल त्याला सौर कृषी पंप योजणे अंतर्गत सौरपंपाचे कृषी सर्वेक्षण पुर्ण केल्याचा मोबदला म्हणुन 500/-रु लाच रक्कम आज दि.09.07.2025 रोजी सापळा कारवाई 15/55 वा ते 16/08 वा दरम्यान पंचासमक्ष स्विकारली म्हणुन त्यांचे विरुध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिकाऱ्याचे नाव):** ALKA MOHAN GAIKWAD **Rank (हुद्दा):** पोलीस निरीक्षक

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची स्वाक्षरी)**

14. **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा)**

**Name (नाव):** Devendrasinh Bahadursinh Thakur

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

Convert to Word

Scanned with OKEN Scanner